दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार ४ ऑक्टोबर २०२४ | अंक २९१ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# नाहीतर फडवणीस यांच्यावर, मनोज जरांगे पाटील यांचं देवेंद्र फडणवीसांबद्दल मोठं वक्तव्य

## देवेंद्र फडवणीस यांना पश्चातापाची वेळ येईल

फडवणीस साहेब आरक्षण दिल्याशिवाय आचारसंहिता लावणार नाहीत. त्याची आम्हाला खात्री आहे. मी लोकसभेच्या अगोदर सांगितले होते, मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय सरकार निवडणूक घेणार नाही. निवडणूक लागण्या अगोदर मराठ्यांच्या मागण्याचा विचार करा, अन्यथा देवेंद्र फडवणीस यांच्या आयुष्यातील मोठी पश्चातापाची वेळ येईल. भाजपमधील मराठ्यांनी पण हाच विचार करा. त्यांनी फडणवीस यांना सांगा नाही तर माझा नाईलाज आहे. देवेंद्र फडवणीस यांनी निवडणूक लागण्या अगोदर मराठ्यांच्या मागण्या मान्य कराव्या, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.



## ‘माझ्या नावाने बोंबलायचे नाही’

“भाजपामधील मराठ्यांनी पण हाच विचार करावा आणि फडणवीस यांना सांगा. नाहीतर माझा नाईलाज आहे, तुम्ही तुमच्या नेत्याला फडवणीस याना समजून सांगा. फडवणीस निवडणूक लागण्याअगोदर मागण्या मान्य करा, मराठ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याशिवाय निवडणूक घेऊ नका. मागण्या मान्य केल्या नाही तर माझ्या नावाने बोंबलायचे नाही. तुमचे लोक आमच्याकडे येतात. फडवणीस याना हिताचे सांगतो, मराठ्यांना डावलू नका. तुम्हाला शब्द आहे, मागण्या मान्य केल्या नाही तर सुफडा साफ होईल” असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी


“अजूनही तब्येत बरी नाही, परंतु दसरा मेळावा आहे आणि त्याचे नियोजन करण्यासाठी हॉस्पिटलमधून सुट्टी घेत आहे. दसरा मेळाव्याला येणाऱ्यांसाठी बीड जिल्ह्यातील मंगल कार्यालय उघडे ठेवावे. जेणेकरुन दसरा मेळाव्याला येणाऱ्यांची व्यवस्था होईल. राज्यातील मराठ्यांची इच्छा होती, दसरा मेळावा झाला पाहिजे. कधी दसरा येतो असे खूप आशा लागली आहे. दसरा मेळाव्याला तुफान पोरं येणार आहेत. कुठेतरी एकत्र यावे म्हणून हा दसरा मेळावा. पण त्याचे राजकीय अर्थ काढू नका” असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दसरा मेळाव्याला या. कुठे इकडे तिकडे मेळावे असतील तिकडे जाऊ नका. दसरा मेळाव्याला कोणी राजकारणी म्हणाला जाऊ नका, अडवण्याचा प्रयत्न केला त्यांची नावे सांगा. सर्व नेत्यांना सांगतो, आडवे पडू नका ..गप्प रहा” असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “दसरा मेळाव्यात आणि विधानसभा एकत्र आल्या, त्याला आम्ही काही करू शकत नाही. नारायणगडावर होणार दसरा मेळावा हा मराठा दसरा मेळावा नाही, या मेळाव्याला अठरा पगड जातीचे लोक येणार आहेत” असं मनोज जरांगे म्हणाले. “फडवणीस साहेब आरक्षण दिल्याशिवाय आचारसंहिता लावणार नाहीत. आम्हाला त्याची खात्री आहे. मी लोकसभेच्या अगोदर सांगितले सरकार निवडणूक घेणार नाहीय. निवडणूक लागण्या अगोदर मराठ्यांच्या मागण्याचा विचार करा, नाहीतर फडवणीस यांच्या आयुष्यातील मोठी पश्चातापाची वेळ येईल” असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# अखिल भारतीय मराठा महासंघाच्या बीड तालुकाध्यक्षपदी अविनाश घिगे यांची निवड



दैनिक लोकआरंभ//

बीड (प्रतिनिधी):- अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने रा.अध्यक्ष दिलीपदादा जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे संतोष नानवटे यांच्या उपस्थितीत भव्य बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मराठा महासंघाच्या सामाजिक कार्याच्या आढाव्याचे वाचन करण्यात आले. तथा येत्या काही दिवसातच आळंदी येथे संत संमेलन घेण्याच्या विषयावर ठराव संमत करण्यास आले. बैठकीत पुढे संघटना बांधणी संदर्भात बोलतांना बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे यांनी काही सहकार्यांच्या निवडी जाहीर केल्या. यात अविनाश घिगे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून तसेच मराठा चळवळीतील त्यांचे योगदान पाहून त्यांच्यावर बीड तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्याचे निश्चित केले. अविनाश घिगे यांना राष्ट्रीय अध्यक्ष दिलीपदादा जगताप यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून त्यांची एक मताने निवड करण्यात आली. मराठा महासंघ ही संघटना मराठा समाजाच्या हितासाठी लढणारी वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरुन आंदोलन करुन न्याय मिळवणारी सर्वात जुनी वैचारिक अधिष्ठान असणारी संघटना गेल्या अनेक दशकापासून कार्यरत आहे. त्या विचाराला व आदर्शाला आपण सर्वजण सार्थ ठराल असे अध्यक्ष दिलीपदादा जगताप यांनी यावेळी मत मांडले. या बैठकीस वारकरी संत मेळाव्याचे प्रमुख बब्रुवान काका शेंडगे, बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे, धनंजय चव्हाण, युवराज मातकर, सुरज कोकाटे, दिनेश जाधव, विशाल आदमुने, शैलेश इंदुरे सह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




सप्तश्रृंगी गडावरती खाजगी वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे या संदर्भातील जिल्हा प्रशासनांना आदेश काढले असून राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस व्यतिरिक्त इतर सर्व खाजगी वाहनांना प्रवेश बंद असणार आहे... 3 ऑक्टोंबर ते 12 ऑक्टोंबर पर्यंत नवरात्र उत्सव असल्याने सकाळी सहा वाजल्यापासून सर्व खाजगी वाहनांना प्रवेश बंद असेल. नवरात्र उत्सवात भाविकांची गडावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते.

# भाजप श्रेष्ठींकडून एकनाथ शिंदेंना झुकते माप, भाजप मध्ये सुरु झाले नाराजीनाट्य, नेमके काय आहे कारण?

**( मुंबई प्रतिनिधी )**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ ऑक्टोबर रोजी मुंबईत येत आहे. यावेळी पंतप्रधान ठाण्यात मुंबई मेट्रोच्या तिसऱ्या लाईनच्या उद्घाटन करणार आहे. मुंबई ऐवजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गडात हा कार्यक्रम होणार आहे. त्यामुळे भाजपमध्ये नाराजीनाट्य सुरु झाले आहे. भाजप पक्षश्रेष्ठींकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना झुकते माप दिले जात असल्याचे म्हटले जात आहे. मेट्रो तीनच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मुंबईत करण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी ठाण्यात करणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनिमित्त शक्तिप्रदर्शनाची संधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आग्रहामुळे ठाण्यात कार्यक्रम होत असल्याने भाजपमधील नेते अन् कार्यकर्ते नाराज झाले आहे. यामुळेही भाजपमध्ये नाराजी राज्यातील विविध महामंडळांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेत्यांच्या नियुक्त्या झाल्या आहेत. परंतु भाजपच्या कार्यकर्त्यांना संधी दिली गेली नाही. त्यामुळे सत्तेतील लाभ व महत्वाची पदे शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाला मिळत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते नाराज होत आहे. भाजप कार्यकर्त्यांना त्याग अन् काम करण्याचे धडे पक्षातील श्रेष्ठींकडून देण्यात येत आहे. जागा वाटपावरुन नाराजी लोकसभा निवडणुकीत ठाणे मतदार संघाचा



तिढा चांगलाच पेटला होता. भाजप कार्यकर्ते ठाणे मतदार संघ शिवसेनेसाठी सोडण्यास तयार नव्हते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी दबाव आणून ही जागा शिंदे गटाला सोडण्यास भाग पाडली. आता विधानसभा निवडणुकीत शिंदे गटाने ठाणे जिल्ह्यातील भाजपला हव्या असलेल्या काही जागांवर दावा सांगितला आहे. त्यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत. भाजप कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे श्रेय शिंदे आणि पवार गटाला मिळत असल्याने भाजपमध्ये नाराजी वाढत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ ऑक्टोबर रोजी मुंबईत येत आहे. या दौऱ्यात आरे कॉलनी ते बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स म्हणजे बीकेसी दरम्यान धावणाऱ्या मेट्रोचे उद्धघाटन ठाण्यातून ते करणार आहे. १२ किलोमीटरचा हा मार्ग आहे. या टप्प्यात एकूण १० स्थानके असणार आहे. तसेच यावेळी नरेंद्र मोदी राज्यातील इतर अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचेही उद्घाटन करणार आहेत.

# ऐतिहासिक दसरा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी ८५ वर्षाचा तरूण सरसावला

संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राची धाकटी पंढरी नारायणगड येथे पारंपरिक दसरा मेळावा यंदा ऐतिहासिक स्वरूपात होतोय. मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीतीत विचारांचं सोनं लुटण्यासाठी लाखो लोक गडावर येणार आहेत. राज्यातून येणाऱ्या बांधवांची सोय व्हावी म्हणून गडाचे महंत गुरूवर्य शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली चोख नियोजन सुरू आहे. गडावर अनेक लोक येऊन आपले योगदान देत आहेत. शिरापूर धुमाळ



येथील ८५ वर्षाचे विठ्ठल सोनाजी बहीर हातात विळा घेऊन गडावर काटेरी झुडपं कापताना दिसले. ज्या वयात आराम करायचा असतो त्या वयात हे गृहस्थ जेव्हा जोमाने काम करताना दिसले तेव्हा एकच गोष्ट जाणवली ती म्हणजे समर्पण! महाराष्ट्रातील सामान्य माणसाने मनोज जरांगे पाटील यांच्या प्रामाणिक कार्यासाठी वाहून घेण्याचा निर्धार केलाय. दसरा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी ८५ वर्षाचा तरूण सरसावलाय त्यामुळे आता हा मेळावा ऐतिहासिकच होणार!

# सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली माजलगाव बस स्थानकाची स्वच्छता

युवक व क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या दरम्यान राबवण्यात येत असणाऱ्या “सेवाही स्वच्छता - 2024” या अभियानांतर्गत सार्वजनिक स्थळांची स्वच्छता या



संकल्पनेनुसार माजलगाव येथील बस स्थानकाची स्वच्छता श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य सुहास मोराळे यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, डॉ. गजानन होन्ना, कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर, डॉ. सुनील पाटील, डॉ. ज्ञानेश्वर गवते व एन.एस. एस. च्या सर्व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. हे अभियान यशस्वी करण्यासाठी माजलगाव बस आगाराचे व्यवस्थापक श्री. कोळपकर , त्यांचे सहकारी श्री. महेश गायकवाड तथा त्यांच्या सर्व टीमने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला व खूप मोलाचे सहकार्य केले.

# मराठा मंडळ ठाणे महिला विभागातर्फे नवरात्र विशेष कार्यक्रमाचे आयोजन



ठाणे: मराठा मंडळ ठाणे महिला विभागातर्फे नवरात्रीनिमित्त कुंकुमार्जन सोहळा आणि श्रीसूक्त निरूपणाचा कार्यक्रम

बुधवार, ९ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक केंद्र, मराठा मंडळ, ठाणे येथे प्रसिद्ध लेखिका आणि प्रवचनकार प्रा. प्रज्ञा पंडित यांचे श्रीसूक्त निरूपण आयोजित केले आहे. महिलांसाठी विशेष अशा या कार्यक्रमात, नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून श्रीसूक्ताचे महत्त्व विशद करणार आहेत कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महिलाप्रमुख सौ. अपर्णा साळवी आणि महिला उपप्रमुख सौ. जाई सावंत यांनी केले आहे.

# रा. काँ. पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद यात्रेला परळी तालुक्यात भरघोस प्रतिसाद नागरिकांचे मन:पूर्वक आभार

## तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद यात्रेला परळी तालुक्यामध्ये उदंड प्रतिसाद मिळाल्या बद्दल परळी तालुक्यातील सर्व नागरिकांचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी मानले आभार परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये या यात्रेची सुरुवात 29 सप्टेंबर रोजी डिग्रस येथील कालिका मातेचे दर्शन व आशीर्वाद घेऊन सुरुवात झाली ही संवाद यात्रा परळी तालुक्यातील डिग्रस ते गुट्टेवाडी असा प्रवास व 49 गावांमध्ये मार्गक्रम करत व सरासरी 50 हजारच्या जास्त नागरिकांशी थेट संवाद साधत अंबाजोगाई तालुक्यात मार्गस्थ झाली.या यात्रेच्या मार्गदर्शका जेष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे व ज्यांच्या नेतृत्वाखाली होत आहे असे युवक नेते सुनील भैया गुट्टे परळी तालुक्यातील नागरिकांनी या संवाद यात्रेला उदंड प्रतिसाद दिल्या बद्दल तालुकाध्यक्ष या



नात्याने नागरिकांचे आभार मानत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष कायम जनतेच्या हिताच्या कामासाठी सदैव तत्पर असून देशाचे नेते आदरणीय खासदार पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचाराला मानणारा हा परळी विधानसभा मतदार संघ असून या मतदारसंघातील जनतेची सेवा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सदैव तत्पर आहेत असा विश्वास तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी यावेळी दिला.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा, केंद्र सरकारचा सर्वात मोठा निर्णय

महाराष्ट्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक दिवस आहे. कारण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावेल अशी बातमी आता समोर आली आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषा सातासमुद्रापार जगभरात आणखी जास्त वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचणार आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय महाराष्ट्राच्या साहित्यांकांना प्रोत्साहन देणारा आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारने मराठी भाषेसह आणखी पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. केंद्र सरकारने मराठीसह बंगाली, असामी, पाली आणि प्राकृत भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. कें हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वात सातत्याने पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी




भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. महाराष्ट्रातील आणि जगभरातील तमाम मराठीजनांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. द्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर याबाबतची गोड बातमी दिली. "आमच्याकडे आतापर्यंत ज्या नोटिफाईड अभिजात भाषा होत्या. त्यात कन्नड, तेलुगु, मल्याळम होत्या. नव्या भाषेसाठी प्रस्ताव आला. फ्रेम वर्कमध्ये त्या बसल्या आणि त्यांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. आता ज्या नव्या भाषा येतील त्यांनाही याच फ्रेमवर्कमध्ये बसवलं जाणार आहे", अशी प्रतिक्रिया अश्विनी वैष्णव यांनी दिली.महाराष्ट्रातील 12 कोटी जनतेच्या वतीने अतिशय मनापासून आभार मानतो : फडणवीस मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# गोशाळेबरोबरच देशी गाईचे संगोपन व संरक्षण करणारे शेतकरी यांस प्रतिदिन प्रति गाय पन्नास रुपये अनुदान देण्यात यावे :- शिवभुषण जाधव

## शिवभुषण जाधव यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

पाटोदा प्रतिनिधी:- काल परवाच. आपण म्हणजेच महाराष्ट्र सरकारने, महाराष्ट्रातील देशी वंशाच्या गाईंना राज्य मातेचा दर्जा देऊन गौरविले आहे व देशी गाईंना सांभाळणाऱ्या व संरक्षण देणाऱ्या रजिस्टर गोशाळेंना प्रतिदिन प्रति गाय पन्नास रुपये अनुदान घोषित केले आहे, त्याबद्दल आपले व आपल्या सरकारचे अभिनंदन..!

खर पाहिलं तर गाय हा अनादी काळापासून शेतकऱ्यांचा तसेच महाराष्ट्रीयन व एकूणच भारतीय लोकांचा तिच्या उपयुक्त ते पेक्षा धर्माचा, श्रद्धेचा, म्हणूनच भावनेचा विषय होता आणि आहे. मनुष्य म्हणूनच आम्हा भारतीयांना, संस्कृती रक्षकांना, माणसात देव न शोधता, पशुमध्ये देव दाखविणाऱ्या धर्मांच्या ठेकेदारांना, माणसाच्या स्पर्शाचा विटाळ होतो आणि गाईला शिवले की सर्व विटाळ निघून जातो, सर्व पापे देखील धुवून जातात, नष्ट होतात, गाईवर सामान्य जणांची एवढी श्रद्धा कि गाईच्या शेपटाला हात लावून बोलणे म्हणजे शंकर शंभर टक्के खरे बोलला असे मानले जाते, कदाचित खरं खोटं करण्यासाठी गाईचे शेपूट ओढ किंवा त्याला हात लाव ही म्हण यामुळेच प्रसिद्ध झाली असेल. गाईवर सामान्य जणांची अपार श्रद्धा आणि व्यवहारिक दृष्ट्या गाय ही शेतकऱ्यांसाठी सर्वसामान्यांसाठी गोरगरिबांसाठी कामधेनुच, कारण काय ती शेतकऱ्यांच्या जीवनात गोकुळ निर्माण करत होती, समृद्धी आणत होती, कुटुंबाची उपजीविका भागवत होती, म्हणून गाय म्हणजे मायच होती. शेतकऱ्यांना गाय, दूध, दही, लोणी, तूप तसेच शेतीच्या कामाकरिता बैल मिळवण्यासाठी तिच्या मलमूत्राचा शेतीच्या सुपीकथेसाठी, श्रद्धा म्हणून, दूध, देवाच्या अभिषेकासाठी, ,मलमूत्राचा गोमूत्र म्हणून बाटलेल्या माणसाला शुद्ध करण्यासाठी, नव्हे देवालाही शुद्ध करण्यासाठी, जे काही अपवित्र आहे ते पवित्र करण्यासाठी, गोमूत्र प्राशन करण्यासाठी उपयोग होत होता आणि आज देखील विज्ञान युग तंत्रज्ञानाचे युग आहे असे जरी म्हटलं तरी गाईपेक्षा गोमूत्राचे महत्त्व पटवून देणाऱ्याला आणि समाजाला वाटण साहजिकच आहे. कारण येथे भारतात चंद्रयान पाठविण्याआधी, खुद्द शास्त्रज्ञांना देखील चंद्र यानाची प्रतिकृती बालाजीला अर्पण करावी वाटते. नव्हे अर्पण केली जाते म्हणूनच गर्वाने खरोखरच भारत विश्व गुरु झाला आहे असे वाटते ! खरं पाहिलं तर आम्ही शेतकरी गायीकडे व्यवहारिकतेने उपयुक्त पशु म्हणून जरी वि.दा सावरकरांनी सांगितले आहे तरी पाहत नाही. तो आमचा श्रद्धेचाविषय बनतो किंवा बनवला गेला असेल, म्हणूनच आम्ही शेतकरी गाईच नाही तर गोवंश बैल याचा सुद्धा सांभाळ करत आहोत, धर्माचे ठेकेदार स्वतःच्या आई-वडिलांना वृद्धाश्रमाचे दार दाखवतात परंतु आम्ही शेतकरी आयुष्यभर कष्ट केलेला बैलाला, शेतकऱ्यांच्या जीवनाचे गोकुळ करणाऱ्या गाईला, दावणीलाच मरू देत मेल्यावर त्यांना मिठात पुरत हीच आमची शेतकरी संस्कृती आमचा धर्म आणि हाच खरा हिंदू धर्म. परंतु वाढती लोकसंख्या, वाढता दुष्काळ, वाढते शेतीवरील अवलंबित, व कमी झालेले चराऊ शेतकुरणे, देशी गोवंशापासून मिळणारे कमी दूध, दुधाला न मिळणारा योग्य भाव, वाढलेले पशुखाद्याचे भाव, दूधभेसळ, आतबट्ट्यात आलेली शेती, यांत्रिकीकरण, शासनकर्त्याचे शेतीबद्दलचे उदासीन धोरण, यातून शेतकऱ्यांचे आर्थिक धोरणच नाही तर शेतकरी वर्ग कोलमडून गेला. गोवंश सांभाळणे आर्थिकदृष्ट्या न परवडणारे झाले. भावनिक दृष्ट्या नाईलाजाने दावणीला चाऱ्याअभावी पाण्याअभावी दावणीला तरफडून मारण्यापेक्षा जनावराला बाजार दाखवावा लागला कसायाच्या हातात आपल्या गाईचा दोर देताना त्याचा हात थरथरत होता, कमी किमतीत एखादा शेतकरी जर घेईल तर तो त्याला देखील तो द्यावयास तयार होता परंतु सर्व शेतकऱ्यांची तीच व्यथा होती, शेवटी गाय कसायाकडे जात होती, त्या मागचं कारण धोरणकर्ते म्हणवणारे समजून घेत नव्हते व यातूनच ज्याचे कधीच शेणामुतात हात गेले नाहीत, त्यांच्या गोवंशाचा संबंध फक्त गोमूत्रपुरता असणारे गोवंश रक्षक, धर्माचे ठेकेदार, हे कसायाचे कसाई झाले ! वास्तविक पाहता गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. भाकड जनावरे, आजारी, म्हातारी, अपघात झालेले जनावरे, सांभाळणे शेतकऱ्यांना परवडत नाही. गोवंशहत्या बंदी कायद्यामुळे कसाई देखील जनावरे देखील खरेदी करत नाहीत किंवा खटकाने खरेदी केलेल्या जनावरे पकडली जातात. त्यांच्याकडून हप्ते वसुली देखील चालू आहे. पकडलेली जनावरे गोशाळेकडे पाठवली जातात, पाठवलेल्या जनावरांची कुठे नोंद ना फिर्याद, पुढे त्या जनावरांचे काय होते, काही दिवसांनी ते दिसत देखील नाहीत, त्याचा देखील भावनेच्या खाली राजरोस धंदा होतो कि अशी शंका निर्माण होते ? आणि जेव्हा



गाईचे संरक्षण करा म्हणणारे, गोवंशहत्या बंदीचे समर्थन करणारे, व धोरण कर्त्याचे मुले जेव्हा हॉटेलमध्ये बीफ वर ताव मारण्याच्या बातम्या जेव्हा पेपर मध्ये वाचतो, किंवा बीप



व्यापाराच्या संबंधितांनी जेव्हा बातम्या वाचतो, तेव्हा आम्हाला हे सर्व काही मुह मे राम बगल मे छुरी आहे असे वाटते. म्हणून खरंच आपल्या महाराष्ट्रात सरकारला गोमातेचा, राज्य मातेचे, संरक्षण व संवर्धन करायचे असेल तर रजिस्टर गोशाळेबरोबरच देशी गायीचे संवर्धन संरक्षण, सांभाळ करणाऱ्या शेतकऱ्यांना ज्यांच्या गाईच्या नोंदी संबंधित ग्रामपंचायत, पशुवैद्यकीय अधिकारी दवाखाना, यांच्याकडे आहेत, पुरेपूर खात्री करून फोटो, टॅग नंबर, पुरावे ठेवून बघून प्रतिदिन पन्नास रुपये अनुदान द्यावे. जेणेकरून देशी गाय सांभाळणे शेतकऱ्यास सोपे जाईल. गाय बाजारात जाणार नाही, पर्यायाने कसायाकडे (खाटकाकडे) जाणार नाही, आणि गोशाळेची गरज ही भासणार नाही, आणि आपला राज्य मातेच्या संरक्षणाचा उद्देश प्रत्यक्षरीत्या सफल होईल आणि तो खरा आहे हे सिद्ध होईल.


# योग्य बियाणे निवड व जैविक किडनियंत्रन यांची सांगड घातली की उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादन नक्कीच वाढते :- कैलास पन्हाळकर




पाटोदा प्रतिनिधी पाटोदा काकडहिरा येथे नाथ सिड व वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट शाश्वत उपजिविका प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने श्री सुभाष जायभाये यांच्या कापुस जम्बो 303 पिक शेतात शेतीशाळा संपन्न... योग्य बियाणे निवड व जैविक किडनियंत्रन यांची सांगड घातली की उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादन नक्कीच वाढते हे आज शेतीशाळेत सर्वांना अनुभवन्यास मिळाले... कैलास पन्हाळकर सर आणि राजेंद्र जाधव सर जैविक किडनियंत्रनामध्ये वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या शाश्वत उपजिविका प्रकल्पा अंतर्गत चिकटसापळे, पक्षीथांबे, कामगंधसापळे, निंबोळी आर्क फवारणी, दशपर्णी आर्क फवारणी, गांडुळखताचा वापर या प्लॉटला केला आहे..150+ बोंड तयार आहेत... हि आहे योग्य नियोजन जैविक किडनियंत्रन व योग्य बियाणे निवड यांची कमाल...यावेळी काकडहिरा ग्रामविकास समिती टिम मेजर श्री विष्णु जायभाय साहेब, श्री मोहननाना जायभाय ,शेतकरी श्री सुभाष जायभाय, नाथ सिड चे क्षेत्रिय अधिकारी वॉटरशेड टिम मेंबर श्री भरत कवठेकर सर व ईतर शेतकरी उपस्थित होते...कापुस प्लॉट पाहुन व मार्गदर्शन ऐकुन उपस्थित शेतकरी समाधानी झाले...

# कांदिवली पश्चिम येथील मां दुर्गा भवानी मित्र मंडळाच्या नवरात्र उत्सवात देवीचे आगमन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. गुरुवार दिनांक ३ आक्टोंबर २०२४ रोजी कांदिवली पश्चिम येथील मां दुर्गा भवानी मित्र मंडळाच्या देवी चे आगमन मोठ्या उत्साहात, जल्लोषात झाले आहे.सन २०१३ पासून मां दुर्गा भवानी मित्र मंडळाच्या सार्वजनिक नवरात्रौत्सव दरवर्षी सार्वजनिक सेवा समिती चाळ,के.डी.कंपाऊंड, गांधी नगर या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. शारदीय नवरात्र उत्सवाची सुरुवात दिनांक ३ आक्टोंबर २०२४ या दिवशी होऊन महानवमी शनिवार दिनांक १२ आक्टोंबर २०२४ रोजी दसरा या दिवशी संपन्न होते.मां दुर्गा भवानी मित्र मंडळाच्या सार्वजनिक नवरात्रौत्सवात



रात्री या विभागातील पुरुष, महिला,मुले ,मुली देवी च्या गाण्यावर गरबा दांडिया नृत्यात तल्लीन होऊन जातात.या वेळी देवी आगमन होऊन घटस्थापना केली जाते. देवी च्या मूर्ती ची घटांची पूजा केली जाते.मां दुर्गा भवानी मित्र मंडळाच्या सार्वजनिक देवी चे दर्शन दिवस रात्र येथील रहिवासी, देवी भक्त घेतात.या विभागातील श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था चे महासचिव, भारत कवितके, प्रेम शंकर सागर वर्मा, दशरथ गरगडे, गोपाळ घाग, विजेंद्र यादव, अशोक यादव, रुपचंद गुप्ता चाचा, श्रीकांत प्रजापती, प्रेम भाई, यांनी आज घटस्थापना दिवशी देवीचे मनोभावे दर्शन घेतले.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. संतोष लिंबकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रा. लक्ष्मीकांत सोनार यांनी केला. या कार्यक्रमानंतर सर्व एनएसएसच्या स्वयंसेवकांनी




आपापल्या परिसरातील प्लास्टिक संकलन केले. या प्लास्टिक संकलन मोहिमेने महाविद्यालयाचे प्राचार्य सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या दरम्यान राबवण्यात आलेल्या स्वच्छता पंधरवड्याचा समारोप करण्यात आला. या स्वच्छता पंधरवड्यामध्ये एनएसएसच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला, माजलगाव परिसरातील सार्वजनिक स्थळांची स्वच्छता या अंतर्गत माजलगाव बस स्थानकाची स्वच्छता केली, स्वच्छतेच्या संदर्भामध्ये वेगवेगळे प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले, सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली, अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन झाल्यानंतर सिंधफणा नदीमध्ये साठलेले निर्माल्य गोळा करून नदीची स्वच्छता करण्यात आली, याचबरोबर मोठी समस्या असणाऱ्या प्लास्टिकचे संकलन करण्यात आले, स्वच्छते संदर्भात मानवी साखळी तयार करण्यात आली तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती रॅलीचेही आयोजन करण्यात आले या सर्व कार्यक्रमात एनएसएसचे सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक यांनी उत्साहात सहभाग नोंदवला.

# कृषी विज्ञान केंद्र सुवर्ण महोत्सवी सप्ताहाच्या पहिल्या दिवसाला महिलांचा उत्कृष्ट प्रतिसाद


नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : कृषी विज्ञान केंद्र नांदेड कृषी विभाग व आत्मा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र कृषक स्वर्ण समृद्धी सप्ताहाला दिनांक 23 सप्टेंबर पासून सुरुवात करण्यात आली जागतिक पोषण महिन्याचे अवचित साधून महिला शेतकऱ्यांना शेती व जोड व्यवसायासोबत आहार आरोग्य आणि मूल्यवर्धन या विषयावर देखील माहिती असणे गरजेचे आहे त्यानिमित्ताने शेतकरी महिला संवाद व प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्यातील पोखरणी सायाळ लिंबगाव तळणी गावातील एकूण ७०-८०महिलांचा समावेश असून कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय आमदार श्री बालाजी कल्याणकर यांच्या सौभाग्यवती सौ संध्या ताई कल्याणकर यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ एस डी मोरे यांनी भूषविले कार्यक्रमाची सुरुवात भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या गीताने व माता सरस्वती आणि बळीराजाच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली स्वागत समारंभ नंतर सौ संध्या ताई मार्गदर्शन करताना कृषी विज्ञान केंद्राचे उद्दिष्ट , आणि विस्तार कार्य अतिशय महत्वपूर्ण असून, शेतकऱ्यांनी संशोधनातून निर्मित तंत्रज्ञानाचा ,कष्ट कमी करणाऱ्या तंत्रांचा वापर करून शेती कार्य सुलभ करावे, असे त्यावेळी सांगितले.वेळोवेळी कृ.वि. कें. आयोजित वेगवेगळ्या विषयावर होणाऱ्या प्रशिक्षणाचा देखील शेतकरी महिलांनी अवश्य लाभ घ्यावा असं त्या त्यावेळी म्हणाल्या. तसेच क्रविके चे




वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.देविकांत देशमुख यांनी कृ.वि.के.ची कार्यप्रणाली उद्दिष्टे तसेच उद्यान विद्या विषयांमध्ये जोड व्यवसायाच्या उपलब्ध संधी भाजीपाला शेती, फळबागा, फुल शेती, याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन त्यावेळी शेतकरी महिलांना केले. पिक संरक्षण तज्ञ प्रा.माणिक कल्याणकर यांनी रासायनिक फवारणीच्या अयोग्य आणि अतिरिक्त वापरामुळे मानवी शरीरावर तसेच जमिनीवर होणारे दुष्परिणाम, शत्रू कीटक आणि मित्र कीटक ओळखून मित्र कीटक कसे जोपासावे आणि जैविक औषधांचा वापर या गोष्टी समजावून सांगत त्यामध्ये असणाऱ्या व्यवसायाच्या संधी देखील अवगत करून दिल्या. तसेच पशुवैद्यक तज्ञ डॉ. महेश आंबोरे यांनी कुक्कुटपालन,मत्स्य व्यवसाय,शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, त्यासाठी मिळणारे अनुदान ,योजना आणि शेतीपूरक जोड व्यवसाय अशा विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कृषी विद्या तज्ञ प्रा. संदीप जायभाये यांनी एकात्मिक शेतीचा वापर करून उत्पन्न वाढवण्यावर भर द्यावा, जोड व्यवसाय म्हणून गांडूळ खत, कंपोस्ट खत, सेंद्रिय निविष्ठा यासारख्या निविष्ठा बनवण्याच्या प्रशिक्षणाचा कृषी विज्ञान केंद्र आयोजित प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यावेळी त्यांनी केले.गृहविज्ञान तज्ञ प्रा.अल्का पवळे यांनी महिलांना शेती काम करताना होणारा त्रास,कष्ट आणि वेळेची बचत यासाठी कष्ट कमी करणाऱ्या संशोधित तंत्रज्ञानाची महिलांना ओळख करून देण्यात आली तसेच जागतिक पोषण महिन्याच्या निमित्ताने महिलांचे आरोग्य आणि आहारसाठी सेंद्रिय परसबागतयार करावी यावर देखील मार्गदर्शन करण्यात आले. आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्राचे कर्मचारी श्री.राजीव इंगोले, सौ.प्राजक्ता हाडोळतीकर, श्री.सतीश जाधव, श्री.राकेश वाडीले ,श्री. सुदाम गायकवाड, श्री. दत्ता कदम, श्री. शंकर कोनापुरे, श्री.राहुल राऊत हे देखील त्यावेळी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ४ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात डॉ. अंजलीताई घाडगे यांना मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद




अंबाजोगाई (प्रतिनिधी) केज मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी व वर्षानुवर्षे विकासापासून कोसो दूर असलेल्या या मतदारसंघाचा चौफेर विकास करण्याची दृष्टी ज्यांच्याकडे आहे. त्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांना अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. २ ऑक्टोबर रोजी डॉ.अंजलीताई यांनी अंबाजोगाई शहरातील अनेकांना भेटून थेट संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या लोकप्रिय ठरत असलेल्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे या मागील अनेक वर्षांपासून समाजकारणात व राजकारणात कार्यरत आहेत. त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. नवी आव्हाने पेलून त्या आता विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झेप घेण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्यांनी निवडणूक लढविण्याची पूर्णतः तयारी केली आहे. केज हा मतदारसंघ मागील ३० वर्षांपासून राखीव आहे. तो ज्यांच्या ताब्यात आहे. त्यांनी अंबाजोगाई जिल्हा करतो, बुट्टेनाथ साठवण तलाव निर्माण करण्याचे, काळवटी साठवण तलावाची उंची वाढविणार, एमआयडीसी उभारणार यासारख्या विविध भूलथापा देवून प्रत्येकवेळी जनतेला भावनिक केले. व विविध निवडणुका जिंकल्या आहेत. परंतु, केज विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास ते करू शकले नाहीत. या मतदारसंघातील रखडलेली कामे, विकासाचा अनुशेष आणि सर्व जाती जमाती व समाजाला सोबत घेवून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची ज्यांची क्षमता आहे. त्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी मागील काही दिवसांपासून पायाला भिंगरी बांधून मतदार संघात समावेश असलेल्या केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील अनेक गावांना भेटी गाठी देत नागरिकांशी चर्चा करीत आहेत. ज्या दिवशी डॉ.अंजलीताई घाडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला त्याच दिवसापासून त्यांनी दौऱ्याला सुरूवात केलेली आहे. याची दखल पक्षाच्या वरिष्ठांनी घेतली आहे. पक्षाने त्यांच्यावर टाकलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी त्या समर्थपणे स्वतःच्या खांद्यावर पेलून नेत आहेत हे विशेष होय. दरम्यान बुधवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी नवरात्रीच्या घटस्थापनेच्या पूर्व संध्येला डॉ.अंजलीताई यांनी अंबाजोगाई शहरात विविध ठिकाणी गाठी भेटी दिल्या. यात भिमाई नगर व परिसर येथे भेट दिली. या भागातील मूलभूत नागरी समस्या आणि आरोग्याच्या या विषयी स्थानिकांशी चर्चा केली. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन स्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन ही दिले. तसेच अंबाजोगाई शहरातील पत्रकार अभिजीत लोमटे यांची मुले चि.श्रीजीत आणि चि.आदित्यराज यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. अंबाजोगाई शहर आणि परिसरात डॉ.घाडगे यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. अंबाजोगाई येथील अंबारी शासकीय विश्रामगृह येथे स्थानिक कार्यकर्त्यांनी डॉ.अंजलीताई यांचे स्वागत केले. आणि आगामी विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## बारामतीकरांना सुप्रिया सुळेंनाच विजयी करायचं होतं, अजित पवारांचा गौप्यस्फोट



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारातमी लोकसभा निवडणुकीच्या निकालाबाबत नवा गौप्यस्फोट केला. बारामती लोकसभा मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यात निवडणूक झाली होती. या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांचा विजय झाला. या निकलावर आज पुन्हा एकदा अजित पवारांनी भाष्य केलं. “मागं जाताना मी फार जोरात जायचो. लोकसभेचा निकाल थोडा वेगळा लागला. बारामतीकरांनी ठरवलं होतं खासदारकीला ताईंना निवडून द्यायचं. त्यामुळे बऱ्याच घरातले काही काही तर म्हणायचे, आमचे चार मते आहेत. दोन दादांना दोन साहेबांना. काहींनी तर चारहीचे चारही मते साहेबांना असंही केलं. पण आता पुढं कुणाला संधी द्यायची ते तुम्ही बघा. परंतु हे झालं आहे. ते नाकारू शकत नाही. अल्पसंख्याक समाज माझ्यापासून दूर गेलेला पाह्यला मिळाला”, असं अजित पवार म्हणाले.

## अरुण गवळीची मुलगी गीता गवळी ठाकरे गटाच्या संपर्कात, दगडी चाळीत काय राजकारण शिजतंय?

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. मुंबई तर प्रचंड घडामोडी घडत आहेत. प्रत्येक पक्ष बेरचजेचं गणित करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे माजी नगरसेविका तथा अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी याची कन्या गीता गवळी शिवसेना ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती मिळत आहे. दक्षिण मुंबईत अरुण गवळीला मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे त्याचा फायदा विधानसभा निवडणुकीत करण्यासाठी ठाकरे गटाची ही रणनीती असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीवेळी गीता गवळी यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. त्यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गीता गवळी यांना महापौर करण्याचं आश्वासन दिलं होतं. यानंतर आता गीता गवळी या ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे ठाकरे गटाचे सचिव तथा आमदार मिलिंद नार्वेकर यांनी गीता गवळी यांची दगडी चाळीत जाऊन भेट घेतली आहे. गीता गवळी भायखळा विधानसभा मतदारंसघातून लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाच महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीवेळी गीता गवळी यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. मात्र त्यानंतर बदललेल्या गणितावरून गीता गवळी मशालीवर निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. अरुण गवळी यांनी स्थापन केलेला अखिल भारतीय सेनेच्या गीता गवळी या नगरसेविका होत्या.

## तलवारीच्या धाकावर लुटणारी टोळी जेरबंद ! स्थानिक गुन्हे शाखेकडून दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

हिंगोली :- (प्रतिनीधी) जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्हयात होणा-या गुन्हयांस प्रतिबंध करून, गुन्हे उघड करण्याबाबत नेहमी सुचना देत असतात स्थानिक गुन्हे शाखेने तलवारीच्या धकावर लुटमार करणारी अंतर जिल्हा टोळी जेरबंद केली आहे त्यांच्याकडून सहा गुन्हे उघडकीस आणले असून अजून काही गुन्हे उघडतील येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे १९ सप्टेंबर रोजी रात्री ११.०० च्या सुमारास आसेगाव वसमत रोडवर फिर्यादी नामे कैलास प्रल्हाद कदम, वय २९ वर्ष, धंदा व्यापार, रा. पाटीलनगर, वसमत यास अज्ञात तिन चोरटयांनी रस्ता अडवुन तलवारीने गंभीर जखमी करून जबरीने मोबाईल, रोख रक्कम व मोबाईल हॅडसेट असा ९६,००० रू चा मुद्देमाल जबरीने चोरून नेल्यासंदर्भाने पो.स्टे. वसमत ग्रामीण येथे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन गुन्हेगारास तात्काळ जेरबंद करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्था.गु.शा. पो.नि. विकास पाटील यांना सदर गुन्हा उघड करण्याच्या सुचना देवुन सपोनि. शिवसांब घेवारे यांचे एक विशेष पथक निर्माण करण्यात आले होते.स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुन्हा घडल्यापासुन बारकाईने गुन्हयाचे विश्लेषण करून तांत्रिक अभ्यास करून गोपनिय माहिती काढली असता सदरचा गुन्हा हा हरज्योतसिंघ चरनजितसिंग बिंद्रा वय २२ वर्ष रा.पंचवटीनगर वसरनी नांदेड, बलप्रितसिंग भुपेंद्रसिंग कदंब वय २६ वर्ष रा. पंचवटीनगर वसरनी नांदेड, रोहित मारोती जाधव वय २१ वर्ष रा.शंकरनगर वसरणी, नांदेड यांनी केल्याची माहिती मिळाली असता स्था.गु.शा. पथकाने आरोपीस नांदेड शहरातुन अतिशय शिताफीने ताब्यात घेवुन कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता सदर आरोपीतांनी उपरोक्त प्रमाणे गुन्हा केल्याचे कबुल करून गुन्हयातील चोरलेले मोबाईल, चोरलेले मोबाईल डिस्प्ले, गुन्हयात वापरलेले मोबाईल, गुन्हयत वापरलेली मोटार सायकल, गुन्हयात वापरलेला खंजर, रोख रक्कम असा १,५०,००० चा मुद्देमाल जप्त केला आहे.

## नेरुळ जेष्ठ नागरिक भवना मध्ये ज्येष्ठांच्या मानसिक आरोग्यावर कार्यक्रम संपन्न.

प्रतिनिधी (नवीमुंबई) सुभाषहांडेदेशमुखः नवी मुंबई : नेरुळ येथील जेष्ठ नागरिक संघ व यशवंतराव चव्हाण नवी मुंबई विभागीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी, एक ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन व गांधी जयंती याचे औचित्य साधून ज्येष्ठांच्या आरोग्यावर कार्यक्रम उत्साही वातावरणात संपन्न झालायशवंतराव चव्हाण नवी मुंबई विभागीय केंद्राचे अध्यक्ष प्रमोदजी कर्नाड यांच्या पुढाकाराने खास ज्येष्ठांसाठी हा कार्यक्रम नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक भवन मध्ये आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात प्रमोद कर्नाड यांनी कार्यक्रमाचे महत्त्व




अधोरेखित केले. तसेच अण्णासाहेब टेकाळे हे महाराष्ट्र शासनाच्या ज्येष्ठ नागरिक महामंडळाचे अध्यक्ष झाले त्याबद्दल त्यांचा गुणगौरव करुन त्यांचा यथोचित सत्कार केला. या कार्यक्रमात मुख्य व्याख्यात्या मानसशास्त्रज्ञ श्रीमती रिचिका गुप्ता यांनी जेष्ठांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सकारात्मक विचारसरणीमुळे माणसाचे आरोग्य चांगले घडू शकते व सर्व परिस्थितीमध्ये “स्वीकार” हा एक मुख्य घटक आहे, त्यामुळे जीवन सुखकर होते व दुःखाची धार बोथट होते असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की, माणसाने भूतकाळ विसरून वर्तमानात जगल पाहिजे. ताणतणावापासून दूर राहिले पाहिजे, आपण माफ करायला शिकलं पाहिजे तसेच कृतज्ञता देखील व्यक्त केली पाहिजे, त्यामुळे मनावरचं ओझं कमी होतं. अशा रीतीने मनाची गुंतागुंत त्यांनी हळुवारपणे अनेक कंगोऱ्यातून उलगडून दाखवली. श्रोत्यांनी उत्सुकतेने त्यांचे व्याख्यान ऐकले व शेवटी श्रोत्यांच्या अनेक शंका, प्रश्न यांना मानसशास्त्रज्ञ रुचिका गुप्ता यांनी कुशलतेने उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विकास साठे यांनी उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार व्यक्त करताना सांगितले की मनाविषयी बोलताना बहिणाबाईंची कविता या ठिकाणी आठवते:
“मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर,
किती हाकला हाकला, फिरी येते पिकावर.
अशी ही मनाची गुंतागुंत आणि त्याचा थांग लागणे कठीण आहे. परंतु मानस शास्त्रज्ञ रुचिका गुप्ता यांनी तो गुंता नजाकतीने सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## उरण नगर परिषदेत महात्मा गांधी जयंती लालबहाद्दुर शास्त्री जयंती उत्साहात साजरी.

उरण दि ३(विठ्ठल ममताबादे ) महात्मा गांधी जयंती निमित्त नगर परिषद क्षेत्रात २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. उरण नगर परिषदेच्या सानेगुरुजी बलोद्यान येथे स्वच्छता अभियान घेण्यात आले सदर अभियानात उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव तसेच लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता निखिल ढोरे, नगर रचना अधिकारी निकम सर , स्वच्छता निरीक्षक हरेश तेंजी, तसेच उरण नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी यांनी श्रमदान केले तसेच उरण नगर परिषद हद्दीतील शाळामधील विद्यार्थी यांनी देखील श्रमदान केले. त्यानंतर स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत दिनांक १७ /९/२०२४ ते २ /१०/२०२४ दरम्यान नगर परिषदे मार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले होते(सायकल स्पर्धा, हेल्थ कँप, एक पेड माँ के नाम वृक्षारोपण) यांचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले तसेच सायकल रॅली मध्ये लकी ड्रॉ सायकल विजेत्या विद्यार्थ्यास सायकल देण्यात आली. उरण नगर परिषदेचे कर्मचारी व नागरिक यांच्या सहभागातून नगर परिषद कार्यालय ते महात्मा गांधी पुतळा पर्यंत स्वच्छता परेड काडण्यात आली.

## मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला.केंद्र सरकारचे आभार




मुंबई प्रतिनिधी - आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त हा केंद्र सरकारचा मोठा निर्णय घेतला आहे. सर्व हिंदू मराठा बांधव मोठ्या संख्येने आनंद साजरा करता आहे. इतकी वर्ष हा लढा सुरू होतो. जे स्वप्न पाहिलं होत मराठी बांधवांनी आज ते खर झाले आहे .आणि उत्साह मनात वाढ आहे. छ. शिवाजी महाराजांचे स्वप्न आज सत्यात उतरत आहे. केंद्र सरकारने हा निर्णय घेऊ सगळ्या ना भेट वस्तू दिली अस वाटत आहे. सर्वजण सरकाचे अभिनंदन आणि आभार मानत आहे.मराठी पाऊल पडते पुढे .... हाच नारा लागणार सऱ्या जगातलाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी ऐकतो मराठी, जाणतो मराठी

## मनपाच्या मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूल मध्ये विद्यार्थिनींनी गिरवले सेल्फ डिफेन्सचे धडे.

मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूलमध्ये नुकताच एक विशेष कार्यक्रम संपन्न झाला, ज्यात नाशिकच्या सुप्रसिद्ध अभिनेत्री, मॉडेल आणि सेल्फ डिफेन्स ट्रेनर सन्मा. रूपाली पवार यांनी विद्यार्थिनींना सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण दिले. या उपक्रमाचे आयोजन मुलींमध्ये आत्मविश्वास आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व जागृत करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते. रूपाली पवार यांनी मुलींना स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांची ओळख करून दिली. यामध्ये प्रत्यक्षिके, साधे पण परिणामकारक



बचावाचे उपाय, तसेच कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी स्वतःची सुरक्षितता कशी साधावी याबद्दलचे प्रशिक्षण होते. त्यांनी या वेळी सांगितले की, आजच्या काळात महिलांसाठी स्वतःचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे आणि या तंत्रांचे ज्ञान त्यांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे ठरू शकते. प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये: या प्रशिक्षणादरम्यान, मुलींना सहज शिकता येणारे आणि कोणत्याही वयातील व्यक्तींसाठी उपयुक्त असे तंत्र शिकवण्यात आले. रूपाली पवार यांनी मुलींना शारीरिक ताकद नव्हे तर आत्मविश्वास कसा वाढवायचा याचे धडे दिले. प्रशिक्षणादरम्यान, शाळेतील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि सर्व प्रकारच्या तंत्रांचे सराव केले. या महत्त्वाच्या आणि आवश्यक अशा कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सन्मा. डॉ.आशा ब्राह्मणे यांनी केलेले होते. उपस्थित शिक्षक आणि पालक यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. प्रेरणादायी संदेश: कार्यक्रमाच्या शेवटी रूपाली पवार यांनी मुलींना आत्मनिर्भर बनण्याचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की, “आपल्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावरच असते, आणि यासाठी मानसिक आणि शारीरिक तयारी असणे गरजेचे आहे.” त्यांनी मुलींना कधीही घाबरू नये आणि कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याचे धैर्य बाळगण्याचा सल्ला दिला. शाळेचा उपक्रम: शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अशा ब्राह्मणे, शिक्षक वर्ग आणि एस एम सी पालक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूलकडून मुलींच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत, आणि हा कार्यक्रम त्याचाच एक भाग आहे.

# हिंदूंना महामूर्ख म्हणणाऱ्या संभाजी भिडेंना तात्काळ अटक करा,संभाजी ब्रिगेडची मागणी

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या आणखी एका नव्या वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे. “गणपती उत्सव, नवरात्र उत्सव हे आता इव्हेंट झाले आहेत. हिंदू समाजाला गांडू बनवत आहेत”, असं वादग्रस्त वक्तव्य संभाजी भिडे यांनी केलं आहे. तसेच “महामूर्ख जमात म्हणजे हिंदू जात”, असंदेखील वक्तव्य संभाजी भिडे यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावर आता विविध स्तरावरुन टीका केली जात आहे. संभाजी बिग्रेडचे नेते संतोष शिंदे यांनी संभाजी भिडे यांना त्यांच्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी अटक करण्याची मागणी केली आहे. “मनोहर उर्फ संभाजी भिडे हा अत्यंत विकृत माणूस



आहे. हिंदू स्त्रिया असो की हिंदू समाज यांच्या विषयी नेहमी वादग्रस्त वक्तव्य करत असतो. समाजा समाजात जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा आणि महाराष्ट्रात दंगली घडवणारा मनोहर भिडे महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. राज्यात जातीवादी वाईट घटनेचा मास्टरमाईंड आहे. अशा विकृत व्यक्तीला सरकारने पाठीशी घालू नये”, असं संभाजी ब्रिगेडचे नेते संतोष शिंदे म्हणाले आहेत. “हिंदूंना महामुर्ख आणि गांडू म्हणणाऱ्या मनोहर उर्फ संभाजी भिडे याला तात्काळ अटक करून सरकारने कायदेशीर कडक कारवाई करावी, अशी संभाजी ब्रिगेडची सरकारकडे मागणी आहे. भिडेच्या वक्तव्याला सरकार नेहमी पाठीशी घालत आहे. सरकारने हिंदूंना महामूर्ख म्हणणाऱ्या या वक्तव्याला गप्प बसून पाठिंबा देऊ नये. अन्यथा सरकारची भूमिका महाराष्ट्राच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. भिडेला तात्काळ आता अटक करा”, अशी मागणी संतोष शिंदे यांनी केली आहे.

## पुणे येथे शरदचंद्रजी पवार यांच्या उपस्थितीमध्ये हजारो कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न.

उरण दि ३(विठ्ठल ममताबादे ) निसर्ग कार्यालय पुणे येथे शरदचंद्रजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आंबेडकरवादी नेते तथा कोरेगाव भीमा चौकशी आयोगातील वकील ॲड.राहुलजी मखरे (माजी राष्ट्रीय महासचिव बी.एम. पी) यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो प्रशिक्षित कार्यकर्त्यांसह जाहीररीत्या पक्ष प्रवेश केला.



आंबेडकरवादी नेते ॲड.राहुलजी मखरे गेल्या ३५ वर्षापासून शिव फुले शाहू आंबेडकर विचार बहुजन समाजामध्ये प्रस्थापित करण्याचे काम करत आहेत तसेच सक्रिय समाजकारणासोबत सक्रिय राजकारणामध्ये देखील राष्ट्रीय स्तरावरती बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय महासचिव पदावरती देशभरामध्ये बहुजनांचे राजकारण यशस्वी करण्यासाठी संघर्ष करत होते. ॲड.राहुलजी मखरे यांच्या व कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) यांना आगामी विधानसभा, नगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मोठ्या प्रमाणामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात फायदा होणार आहे. ॲड.राहुलजी मखरे यांच्या नेतृत्वामध्ये व मा.संतोषभाई घरत (प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एस.पी), मा. बाळासाहेब मिसाळ पाटील (प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एस.पी) यांच्या मार्गदर्शनामध्ये बाबजी नाना भोंग, महावीर वजाळे (माजी प्रदेशाध्यक्ष विद्यार्थी युवा मोर्चा), मा.राजकुमार धोत्रे (अध्यक्ष अखिल महाराष्ट्र वडार समाज संघटना पश्चिम महाराष्ट्र), गौरव पनोरेकर (युवा नेते), ॲड. सुनील आवारे (माजी प्रभारी बसपा- मुंबई प्रदेश), मा.वसीमभाई सय्यद (सामाजिक कार्यकर्ते), वैशाली राक्षे (महिला नेत्या), स्वराज सोनवणे (बिझनेस मॅनेजमेंट लंडन युनिव्हर्सिटी), राज पाटील ( नवी मुंबई) यांच्यासह हजारो युवा कार्यकर्त्यांनी महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एस.पी) मध्ये प्रवेश केला आहे. या प्रसंगी पंढरीनाथ पाटील ( रायगड जिल्हा उपाध्यक्ष, NCP(SP) व करण भोईर ( रायगड जिल्हा सरचिटणीस , NCP(SP) हे देखील उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शुक्रवार ४ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



# लग्नासाठी मुलीच्या वयाची अट १२ आणि मुलाची १४ ठेवावी लागेल, अजित पवार यांचं मोठं वक्तव्य

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलगा आणि मुलीच्या लग्नाच्या वयाच्या अटीबाबत आज मोठं वक्तव्य केलं आहे. ते बारामतीकरांसोबत बोलत होते. यावेळी त्यांनी संबंधित वक्तव्य केलं. यावेळी त्यांनी बारामतीत घडत असलेल्या गुन्हेगारीच्या घटनांवरही मत मांडलं.

**मुंबई / प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलगा आणि मुलीच्या लग्नाच्या वयाबाबत भाष्य करताना महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. "लग्नासाठी मुलीच्या वयाची अट 12 आणि मुलाची 14 ठेवावी लागेल", असं अजित पवार आपल्या भाषणात म्हणाले आहेत. संबंधित वक्तव्य करताना त्यांनी एका घटनेचा किस्सा सांगितला. अजितल पवार यावेळी बारामतीकरांसोबत बोलत होते. "बारामतीकरांनो १९६७ पासून ९१ पर्यंत शरद पवार यांनी प्रतिनिधीत्व केलं. ९१ पासून तुम्ही मला आमदार म्हणून संधी दिली. मी नवखा होतो. मी बरेच शिकण्याचं प्रयत्न केला. मला राजकारणात ३४ वर्ष झाली. बारामतीत कायदा सुव्यवस्था चांगली असावी याचा माझा प्रयत्न सुरू आहे. मला अनेक लोक तक्रारी करत असतात.



ड्रग्जबाबतची माहिती दिली जाते. गांज्याच्या गोष्टीही माझ्या कानावर आल्या. मोकातून सुटून आलेले लोक बापाचा चौक असल्यासारखा उभे राहतात. यांनी एरियाही वाटून घेतले. एकमेकांना प्रवेश देत नाहीत. बाहेरही काही लोक शायनिंग करत असतात. त्यातूनच परवा एक सातारा, बारामती आणि सोलापूरमधील तीन मुलं. दोघांच्या मनात आलं. एकाच्या पोटात रामपुरी चाकू खुपसला. दुसऱ्याने कोयत्याने वार केले. सीसीटीव्हीत मी पाहिलं. अशा प्रकारची अवस्था झाली आहे. बिहार यूपीत ही गोष्ट ऐकतो", असं अजित पवार म्हणाले. "तुम्हाला कुणाचा प्रचार करायचा असेल तर मुभा आहे. तुम्हाला विचार मांडायचा अधिकार आहे. कुणालाही मते देण्याचा अधिकार नाही. आम्ही फक्त विनंती करू शकतो. मतदान कुणाला करायचे हा तुमचा अधिकार आहे. पूर्वी बाजारात माय मावल्या भाजी विकायला बसायच्या. फळ विकायच्या. तेव्हा कुणी तरी यायचं थोडी कोथंबीर घ्यायचे, मिरच्या घ्यायचे. पूर्वी असे प्रकार चालायचे मला ऐकायला आलं होतं. पण मी पोलिसांना सांगितलं मी इथला आमदार आहे. मला ही दादागिरी चालणार नाही. कोणत्याही मोठ्या बापाचा असेना. माझ्या मांडिला मांडी लावून बसणाऱ्याचा नातेवाईक असला तरी सोडू नका. माझ्या घरातला असला तरी मी खपवून घेणार नाही. कुणालाही वेड्यावाकड्या नजरेने त्रास देता कामा नये", असं अजित पवार म्हणाले. "परवाची गोष्ट घडली. माझ्या पद्धतीने पोलिसांना जे सांगायचं ते सांगितलं. मी काही निवृत्त अधिकाऱ्यांशी बोललो, विद्यमान पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो.

## अजित पवार मुला-मुलींच्या लग्नाच्या वयाच्या अटीबद्दल काय म्हणाले?

"आम्ही सरकारशी बोलून राज्य सरकारमध्ये निर्णय घ्यावा लागणार आहे. मुलीला १८ आणि मुलाला २१ ही वयाची अट आहे. मुलीला १३ किंवा १२ करावी लागेल. बाराच करावी लागेल आणि मुलाला १४ वयाची अट ठेवावी लागेल. पूर्वीच्या काळात सर्व गोष्टी उशिरा व्हायच्या. म्हणून १८ आणि २१ वय करावे लागले. आता मुलांना लहानपणीच सर्व कळतं. काय चमत्कार झाला माहीत नाही. पण कदाचित जग फास्ट झालं असेल. त्याचा परिणाम झाला असेल. इलेक्ट्रॉनिक मीडियाचा परिणाम होऊ शकतो. नाही असं नाही. ही गोष्ट घडली", असं अजित पवार म्हणाले. "राज्यात बघतो तर अल्पवयीन मुलं मुलीच करत आहेत. पुण्यातही तसंच घडलं. त्यांना रिमांड होममध्ये ठेवावं लागलं. त्यामुळे कायद्यात बदल करावा लागेल. त्यामुळे या नंबरवर कळवायचं आहे. शक्ती कक्षातील नंबरवर कळवायचं आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात शक्ती कक्ष स्थापन केलं जाणार आहे", अशी माहिती अजित पवारांनी यावेळी दिली. "मला तुम्ही तलवार भेट दिली तर ती तलवार दाखवणं हा सुद्धा गुन्हा आहे. मला वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितलं हा गुन्हा आहे. कार्यकर्ते म्हणतात दादा दाखवा. कायदे कडक झाले आहेत. त्यामुळे पिस्तुल, तलवार दाखवले जातात. त्यावर पोलीस कारवाई करतील. परवा गोविंदा म्हणतो, मी सकाळी कोलकात्याला जात होतो.

## 'महामूर्ख जमात म्हणजे हिंदू जात, गांडू', संभाजी भिडेंची वादग्रस्त वक्तव्य

गणपती उत्सव, नवरात्र उत्सव हे आता इव्हेंट झाले आहेत. हिंदू समाजाला गांडू बनवत आहेत. राजकारण, सत्ताकारण, अर्थकारण शूद्र आहे. हे थुंकण्याच्या लायकीचे विषय. जगाच्या पाठीवर असंख्य देशांनी आक्रमण केलेला बेशर्म लोकांचा समाज म्हणजे हिंदुस्थान आहे" असं धक्कादायक वक्तव्य संभाजी भिडे यांनी केलं आहे. "शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला जगाचा बाप व्हायचा मार्ग शिकवलाय. पण गणपती उत्सवाचा चोथा झाला आहे. नवरात्र उत्सवात दांडिया हिंदू समाजाला गांडू बनवत चालला आहे. हे सर्व नाही चालणार नवरात्राचा बट्ट्याबोळ आम्ही होऊ देणार नाही" असं संभाजी भिडे म्हणाले."काही माता-भगिनी यांनी यापुढे स्वतंत्र दुर्गामाता दौड काढावी. आम्ही नवरात्राचा बट्ट्याबोळ हाणून पाडू. नवरात्र उत्सवात कार्यक्रम करमणूक हे सर्व सध्या सुरू आहे. हे सर्व नाश करत चालले आहेत" असे वक्तव्य संभाजी भिडे यांनी केलं. ते सांगलीमध्ये दुर्गा माता दौडी दरम्यान बोलत होते.'बेशर्म लोकांचा समाज म्हणजे हिंदुस्थान'"जगाच्या पाठीवर असंख्य देशांनी आक्रमण केलेला बेशर्म लोकांचा समाज म्हणजे हिंदुस्थान आहे. आतापर्यंत 76 राष्ट्रांनी आपल्यावर आक्रमणं केली. ते आता पाटलाग करतायत, आपण पाय लाऊन पळत आहोत. हिंदी-चिनी भाई-भाई म्हणणारा पंतप्रधान आपल्याला दुर्दैवाने मिळाला. हिंदू-मुस्लिम भाई-भाई, हिंदुंना शत्रू कोण, वैरी, वाईट कोण, चांगलं कोण हे कळत नाही.

## उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त; सोयाबीनमुळे शेतकऱ्यांचे बिघडले गणित; सांगा, आतबट्ट्याचा व्यवसाय का करायचा?

वाशिम जिल्हा हा सोयाबीनचा हब मानल्या जातो. इथं ९० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी केली जाते. मागील दोन वर्षापासून सोयाबीन पिकाने शेतकऱ्यांची अडचण वाढवली आहे. या पिकाला मिळत असलेल्या अल्प दरामुळं शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलं आहे. सोयाबीनच्या लागवडीला लागणारा खर्च आणि मिळत असलेला अत्यंत कमी भाव यात वाशीम जिल्ह्यातील शेतकरी भरडल्या गेला आहे. सध्या बाजारात सोयाबीनला अवघा 4 हजार ते साडेचार हजार दर मिळत आहे. मात्र याचा उत्पादन खर्च यापेक्षाही जास्त आहे. आणि त्यामुळं सोयाबीनचं पीक शेतकऱ्यांसाठी तोट्याचा व्यवसाय ठरत आहे. हमीभाव तर कागदावरच

केंद्र सरकारनं सोयाबीनला 4,882 रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र बाजारात हा हमी भावही मिळणं कठीण झालं आहे. वास्तविक हा हमीभावही अत्यल्प असल्याचं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना किमान 6000 रुपये दर मिळणं गरजेचा आहे. मात्र मागील दोन वर्षापासून सोयाबीनने 5000 रुपयांचा पण टप्पा



गाठला नाही. खर्चात झाली मोठी वाढ सोयाबीनच्या बियाण्याचे, खताचे आणि कीटकनाशकांचे दर प्रचंड वाढले आहेत. त्या उलट सोयाबीनच्या उत्पादनात मात्र गेल्या काही वर्षात मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, पिवळा मोझ्याक सारख्या बुरशी जन्य रोगाचा वाढलेला प्रादुर्भाव यामुळं सोयाबीनच्या उत्पादनात कमालीची घट झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत एकरी अवघे पाच ते सहा क्विंटल सोयाबीन होतं आहे. आस्मानी, सुलतानी सर्वच संकटात शेतकरी अडकला आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही सोयाबीनच्या दराचा मुद्दा चांगलाच गाजला होता. सोयाबीन पट्ट्यात भाजपला याचा मोठा फटका बसल्याचं दिसून आले.

## पुणे : अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी न्यायाधीशांसमोर ढसाढसा रडला

बदलापुरात अत्याचाराची घटना ताजी असताना पुण्यातही दोन सहा वर्षांच्या चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराची संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यात वानवडी परिसरात एका नामांकीत शाळेच्या स्कूल व्हॅनमध्ये त्या व्हॅनच्या चालकानेच चिमुकल्या मुलींवर अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. आरोपी नराधमाने सलग चार दिवस पीडित मुलींवर अत्याचार केला. पीडित मुलींना त्रास जाणवू लागल्यानंतर संबंधित प्रकार उघडकीस आला. 45 वर्षीय आरोपीकडून 6 वर्षीय चिमुकलीसह तिच्या मैत्रिणीवर 4 दिवसांपासून अत्याचार सुरु होता. आरोपी नराधम हा एका नामांकीत शाळेतील स्कूल बसमध्ये काम करत होता. आरोपी चिमुकलींना पुढे सीटवर बसवत होता. आरोपी बसमध्ये चिमुकलींसोबत अश्लील चाळे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कुठेही वाच्यता करु नये म्हणून आरोपीकडून चिमुकलींना धमकी दिली जात होती. चिमुकलीला वेदना झाल्यावर आईने विचारपूर केली तेव्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी पोलिसांनी 45 वर्षीय आरोपी संजय रेड्डी याला अटक केली आहे. त्याला आज पुणे कोर्टात हजर करण्यात आलं. यावेळी आरोपी कोर्टात न्यायाधीशांसमोर ढसाढसा रडला. कोर्टात काय-काय घडलं?यावेळी सुरुवातीला सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला. दोन्ही मुली अल्पवयीन आहेत. त्यांना त्रास सुरू झाल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. काल गुन्हा दाखल झाला आणि रात्री आरोपीला अटक केली आहे. आरोपीची वैद्यकीय चाचणी करायची आहे. हा प्रकार आरोपीने कुठे केला, कधी आणि का केला हे जाणून घ्यायचं आहे,



भाजप नेते हर्षवर्धन पाटलांचं अखेर ठरलं आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करुन तुतारी हाती घेण्याचा निर्णय झाला आहे. हर्षवर्धन पाटील आणि त्यांची कन्या अंकिता पाटील यांनी मुंबईतल्या सिल्व्हर ओक निवासस्थानावर शरद पवारांची भेट घेतली आणि आता सकाळी 10 वाजता इंदापुरात पत्रकार परिषदेत ते शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची घोषणा करतील. एकीकडे हर्षवर्धन पाटील शरद पवारांना भेटले दुसरीकडे हर्षवर्धन पाटलांचे सुपुत्र राजवर्धन पाटील आणि अंकिता पाटलांनी व्हॉट्सॲपवर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचं तुतारी चिन्हाचं स्टेट्सही ठेवलं. वडिलांच्या घोषणेनंतर अंकिता पाटीलही भाजपच्या युवा मोर्चाचा राजीनामा देणार आहेत.

## खुशखबर! महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ ऑक्टोबरला ४ हजार रुपये येणार



**दैनिक लोकआरंभ//**

पी.एम. किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचे ऑगस्ट 2024 ते नोव्हेंबर 2024 या कालावधीतील अनुक्रमे 18 वा आणि पाचवा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते शनिवार 05 ऑक्टोबर, 2024 ला सकाळी 11.00 वाजता वाशिम येथील समारंभात वितरीत करण्यात येणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यवतमाळ-वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना फेब्रुवारी, 2019 पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची 18 वर्षाखालील अपत्ये) रु. 2000/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रु. 6000/- त्यांच्या आधार आणि डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक 30 सप्टेंबर, 2024 अखेर राज्यातील जवळपास 1.20 कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण 17 हप्त्यांमध्ये सुमारे रू. 32000 कोटीचा लाभ जमा झालेला आहे. पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सन 2023-24 पासून नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या 14 व्या हप्त्यापासून पुढील प्रत्येक हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षात एकूण चार हप्त्यांमध्ये एकूण 91.45 लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रु. 6949.68 कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. जुन 2023 पासून आयोजित गावपातळीवरील विशेष मोहिमांद्वारे पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची 20 लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पूर्तता झाल्याने देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांची संख्या आजरोजी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरली आहे.केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या 18 व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ईकेवायसी पूर्ण केलेल्या एकूण 91.52 लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात रू. 1900 कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ तर राज्याच्या योजनेमधून रू. 2000 कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com